॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ९१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

✲ सुविचार ✲

विचार सकारात्मक असतील
तर परिणाम सकारात्मक मिळतात.

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### निसर्ग

कसे दिवस आले?
निसर्गाला आली कळा
पावसाळ्यात चक्क
आला वाटत उन्हाळा
झाड लावा म्हणता खर
झाडे कापली जास्त
आम्हाला कोण खातय?
भ्रमात जिरली मस्त

## SPOT NEWS

### अरबी समुद्रात ३ हजार कोटींचे ड्रग्ज जप्त

● **गांधीनगर** – भारतीय तटरक्षक दल आणि गुजरातच्या दहशतवाद विरोधी पक्षकाने अरबी समुद्रामध्ये धडक कारवाई करत आंतरराष्ट्रीय सागरी तस्करांचा मोठा डाव उधळून लावला आहे. या संयुक्त कारवाईमध्ये इराणी बोटीसह तब्बल ३ हजार कोटी रुपयांचे ५२६ किलोग्रॅम हेरॉईन आणि मेथाम्फेटाईन हे अंमली पदार्थ जप्त करण्यात आली आहे. तसेच बोटीवरील पाच पाकिस्तानी नागरिकांनाही बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. लक्षद्वीप जवळील सागरी हद्दीतून अंमली पदार्थांची तस्करी सुरू असल्याची गुप्त माहिती भारतीय तटरक्षक दलाला मिळाली होती. त्यानंतर तटरक्षक दलाने हवाई आणि सागरी पाळत वाढवली होती. एक संशयित इराणी बोट भारतीय सागरी हद्दीच्या दिशेने येत असल्याचे स्पष्ट होताच तटरक्षक दलाने जहाजांनी आणि विमानांनी बोटीचा पाठलाग सुरू केला. त्यानंतर बोटीला घेरून तटरक्षक दलाच्या पथकाने त्यावर ताबा मिळवला. दरम्यान, या बोटीतून ५२६ किलो हेरॉईन आणि मेथाम्फेटामाईन जप्त केले. आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये याची किंमत ३ हजार कोटींहून अधिक आहे.

### निळ्या ड्रम हत्ये प्रकरणी मुस्कान, साहिल दोषी

● **मेरठ** – देशभरात गाजलेल्या उत्तर प्रदेशमधील मेरठ येथील सौरभ राजपूत हत्या प्रकरणात जिल्हा न्यायालयाने बुधवार दि. ३० सप्टेंबर रोजी सौरभची पत्नी मुस्कान आणि तिचा प्रियकर साहिल शुक्ला यांना दोषी ठरवले. आता न्यायालय शिक्षेच्या प्रमाणाबाबत युक्तिवाद ऐकून घेणार असून शिक्षेबाबतचा निर्णय राखून ठेवण्यात आला आहे. १८ मार्च २०२५ रोजी, इंदिरानगर येथील रहिवासी असलेल्या बबलूने ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्याने सांगितले की, त्याचा भाऊ सौरभ याने २०१६ मध्ये मुस्कान रस्तोगी हिच्याशी प्रेमविवाह केला होता. मुस्कानचे २०१९ पासून साहिल शुक्ला याच्याशी संबंध असल्याचा आरोप करण्यात आला. बबलूच्या म्हणण्यानुसार, पत्नी आणि साहिल यांच्याकडून मिळणाऱ्या धमक्यांमुळे सौरभला आपल्या जीविताची भीती वाटत होती. सौरभ ५ मार्च २०२५ पासून बेपत्ता होता. तो राहत असलेले भाड्याचे घर कुलूपबंद अवस्थेत आढळले आणि मुस्कानही तिथे नव्हती.

# जिल्हा बँकेसाठी अर्ज विक्री जोरात मात्र दाखल अर्ज मोजकेच

## तिसऱ्या दिवसाअखेर ६८० उमेदवारी अर्जांची विक्री । प्रत्यक्षात केवळ ११ अर्ज दाखल । अर्ज भरण्यासाठी इच्छुकांची धावपळ वाढणार

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीची रणधुमाळी आता चांगलीच रंगू लागली असून, निवडणूक कार्यालयात इच्छुक उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांची वर्दळ वाढत आहे. उमेदवारी अर्ज घेण्यासाठी इच्छुकांची मोठी गर्दी होत असली, तरी प्रत्यक्ष अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला अद्याप अपेक्षित वेग आलेला दिसत नाही. बुधवारअखेर तब्बल ६८० उमेदवारी अर्जांची विक्री झाली असताना, प्रत्यक्षात केवळ ११ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

उमेदवारी अर्ज विक्रीच्या दुसर्या दिवशी तब्बल १७० अर्जांची विक्री झाली. त्यामुळे पहिल्या दिवशी ३६१ असलेली अर्ज विक्रीची संख्या दुसऱ्या दिवशी ५३१ वर पोहोचली. दरम्यान, राहुरी तालुका विकास सोसायटी मतदारसंघातून आमदार प्राजक्त तनपुरे, महिला राखीव मतदारसंघातून जिल्हा परिषद अध्यक्षा मंजूषा गुंड, तर बिगरशेती मतदारसंघातून धनलक्ष्मी हजारे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

बुधवारी दिवसभरात तब्बल १४९ अर्जांची विक्री झाली. त्यामुळे निवडणूक कार्यालय परिसरातील राजकीय हालचालींना मोठी गती मिळाली आहे. विविध मतदारसंघांतून निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून अर्ज घेण्याची लगबग सुरू आहे. अनेक इच्छुकांनी स्वतः निवडणूक कार्यालयात उपस्थित राहून अर्ज घेतले, तर काहींनी आपल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून अर्ज मागवून घेतले आहेत.





विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, खासदार नीलेश लंके, आमदार मोनिका राजळे आणि आमदार अक्षय कर्डिले यांच्यासह अनेक इच्छुकांनी बुधवारी उमेदवारी अर्ज घेतल्याने निवडणुकीतील राजकीय समीकरणांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीची रंगत आणखी वाढली आहे.

सभापती राम शिंदे यांनी बुधवारी सकाळी साडेबारा वाजण्याच्या सुमारास कर्जत आणि जामखेड या दोन मतदारसंघांसाठी उमेदवारी अर्ज घेतले. त्यानंतर दुपारच्या सुमारास खासदार नीलेश लंके आणि बँकेचे माजी संचालक दत्तात्रय पानसरे यांनी निवडणूक कार्यालयातून अर्ज घेतले. आमदार मोनिका राजळे आणि आमदार अक्षय कर्डिले यांनी मात्र कार्यकर्त्यांच्या माध्यमातून उमेदवारी अर्ज मागवून घेतले.

दरम्यान, बुधवारी प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्यांमध्ये बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड (पारनेर), संजयकुमार कर्नावट (पारनेर), चंदा गंगाधर गर्जे (शेतीपूरक, पाथर्डी) आणि आजिनाथ हजारे (जामखेड) यांचा समावेश आहे. यामुळे अर्ज घेणाऱ्यांच्या तुलनेत प्रत्यक्ष अर्ज दाखल करणाऱ्यांची संख्या अद्याप अत्यल्प असल्याचे चित्र आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. शुक्रवार, शनिवार आणि रविवार अशा सलग तीन दिवस सुट्या असल्याने उमेदवारांना अर्ज दाखल करण्यासाठी गुरुवार आणि त्यानंतर सोमवार असे केवळ दोन दिवस उपलब्ध राहणार आहेत. त्यामुळे आज, गुरुवारी निवडणूक कार्यालयात इच्छुक उमेदवारांची मोठी गर्दी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

आतापर्यंत मोठ्या संख्येने अर्जांची विक्री झाल्यामुळे शेवटच्या दोन दिवसांत प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या संख्येत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. अनेक इच्छुकांनी अर्ज घेतले असले तरी अंतिम निर्णय घेऊन प्रत्यक्ष अर्ज भरण्याची प्रक्रिया अद्याप बाकी आहे. त्यामुळे पुढील दोन दिवसांत कोणकोणते उमेदवार रिंगणात उतरतात, याचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे.

### राजकीय हालचालींना वेग

■ जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध मतदारसंघांत राजकीय हालचालींना वेग आला आहे. प्रमुख राजकीय नेत्यांनी उमेदवारी अर्ज घेतल्याने निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. अर्ज विक्रीची मोठी संख्या आणि प्रत्यक्ष दाखल अर्जांची कमी संख्या यामुळे शेवटच्या टप्प्यातील घडामोडींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. गुरुवार आणि सोमवार या दोन दिवसांत मोठ्या प्रमाणावर उमेदवारी अर्ज दाखल होण्याची शक्यता असल्याने निवडणूक कार्यालयातही हालचाली वाढणार आहेत. त्यामुळे अर्ज दाखल करण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी कोणते इच्छुक प्रत्यक्ष निवडणूक रिंगणात उतरतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# एमएसपी वाढीसह २.७९ लाख कोटींच्या पॅकेजला मंजुरी

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत तीन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या निर्णयांचे एकूण आर्थिक मूल्य तब्बल २.७९ लाख कोटी रुपये आहे. यामध्ये शेतक-यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेत रबी हंगामातील सहा पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीने मार्केटिंग सीझन २०२७-२८ साठी गहू, बार्ली, हरभरा, मसूर, मोहरी आणि करडई या सहा रबी पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, या वाढीमुळे शेतक-यांना त्यांच्या उत्पादनाला अधिक चांगला भाव मिळण्यास मदत होईल. रबी पिकांमध्ये करडईच्या एमएसपीमध्ये सर्वाधिक ६७५ रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे करडईची नवीन एमएसपी ७,२१५ रुपये प्रति क्विंटल झाली आहे. तर गव्हाच्या एमएसपीमध्ये सर्वात कमी २५ रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे. गव्हाची नवीन एमएसपी आता २,६१० रुपये प्रति क्विंटल असेल.

**रबी पिकांच्या एमएसपीमधील वाढ**

गहू : नवीन एमएसपी २,६१० प्रति क्विंटल – २५ वाढ

बार्ली (जव): नवीन एमएसपी २,२८६ प्रति क्विंटल – १३६ वाढ

हरभरा: नवीन एमएसपी ५,९५८ प्रति क्विंटल – ८३ वाढ

मसूर : नवीन एमएसपी ७,३९० प्रति क्विंटल– ३९० वाढ

मोहरी : नवीन एमएसपी ६,६१३ प्रति क्विंटल – ४१३ वाढ

करडई : नवीन एमएसपी ७,२१५ प्रति क्विंटल – ६७५ वाढ

**केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती**

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, अखिल भारतीय सरासरी उत्पादन खर्चाच्या तुलनेत गव्हासाठी अंदाजे १०६ टक्के मार्जिन मिळेल. मोहरीसाठी हे प्रमाण ९६ टक्के, मसुरीसाठी ९२ टक्के, हरभ-यासाठी ५९ टक्के, बार्लीसाठी ५८ टक्के आणि करडईसाठी ५० टक्के आहे. सरकारच्या मते, एमएसपी वाढीमुळे शेतक-यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत चांगला भाव मिळण्यास मदत होईल. तसेच वेगवेगळ्या पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन मिळून पीक विविधीकरणालाही चालना मिळू शकते.

**पीएम धारा योजनेलाही मंजुरी**

केंद्रीय मंत्रिमंडळाने ऊर्जा क्षेत्राशी संबंधित पीएम धारा या कार्यक्रमालाही मंजुरी दिली आहे. देशात अक्षय ऊर्जेचा वापर वाढत असताना त्यासाठी आवश्यक असलेली वीज वाहून नेणारी यंत्रणा आणि स्मार्ट ग्रिड सुविधा मजबूत करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, देशाच्या वीज निर्मितीत अक्षय ऊर्जेचा मोठ्या प्रमाणावर समावेश करण्यासाठी केंद्र सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. या प्रकल्पासाठी तब्बल १,८६,४०५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**दिल्लीमध्ये स्मार्ट ट्रॅफिक व्यवस्था**

केंद्रीय मंत्रिमंडळाने दिल्लीसाठी बुद्धिमान वाहतूक व्यवस्थापन प्रणाली(आयटीएमएस) लागू करण्यासही मंजुरी दिली आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने राजधानीतील वाहतूक व्यवस्थेवर अधिक प्रभावीपणे लक्ष ठेवता येणार आहे. वाहतूक कोंडी कमी करणे, रस्त्यावरील सुरक्षितता वाढवणे आणि वाहनांची ये-जा अधिक चांगल्या पद्धतीने नियंत्रित करणे यासाठी या प्रणालीचा वापर केला जाणार आहे. दिल्लीतील या प्रकल्पासाठी अंदाजे १,७९० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या या तीन निर्णयांची एकूण आर्थिक किंमत २,७९,१५७ कोटी रुपये आहे. यापैकी रबी पिकांच्या एमएसपी वाढीसाठी अंदाजे ९०,९६२ कोटी रुपये, पीएम धारा कार्यक्रमासाठी १,८६,४०५ कोटी रुपये, तर दिल्लीच्या कळटर प्रकल्पासाठी १,७९० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या निर्णयांमध्ये शेतक-यांसाठी एमएसपी वाढ, देशाच्या अक्षय ऊर्जा व्यवस्थेला चालना आणि दिल्लीतील वाहतूक व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा वापर अशा तीन महत्त्वाच्या क्षेत्रांवर सरकारने भर दिला आहे.

# सेवानिवृत्त सनदी अधिकारी दिलीप खेडकर यांच्या मालमत्तांवर लाचलुचपत विभागाचे छापे

## १३.३० कोटींची बेहिशोबी मालमत्ता आढळली । पती-पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल

● **पाथर्डी । वीरभूमी–**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे माजी आयुक्त तथा सेवानिवृत्त सनदी अधिकारी दिलीप खेडकर यांच्या तालुक्यातील भालगाव येथील निवासस्थानासह इतर काही ठिकाणी नाशिक व अहिल्यानगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने आज पहाटे छापे टाकले. या कारवाईदरम्यान खेडकर यांच्या विविध मालमत्तांशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेऊन तपासणी करण्यात आली. तपासणीत खेडकर कुटुंबाकडे १३ कोटी ३० लाख रुपयांची बेहिशोबी मालमत्ता आढळल्याचे लाचलुचपत विभागाकडून सांगण्यात आले. याप्रकरणी दिलीप खेडकर व त्यांच्या पत्नी डॉ. मनोरमा खेडकर यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



खेडकर यांच्या संपत्तीची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करणारा तक्रार अर्ज प्राप्त झाला होता. या तक्रारीच्या आधारे कारवाई करत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अहिल्यानगर येथील पोलिस निरीक्षक सविता तांबे यांनी खेडकर दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

पथकाने खेडकर यांनी १९९५ ते २०२३ या कालावधीत केलेल्या आर्थिक व्यवहारांची तसेच मालमत्तांची तपासणी केली. या कारवाईत नाशिक, अहिल्यानगर आणि पाथर्डी पोलिसांचे सुमारे ४० अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

खेडकर हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळात १९८९ पासून सेवेत होते. मे २०२३ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. तपासणीत खेडकर कुटुंबाचे एकूण ज्ञात उत्पन्न १३ कोटी २ लाख ७८ हजार ७७५ रुपये, तर एकूण खर्च १५ कोटी ३३ लाख ७४ हजार ८५५ रुपये असल्याचे आढळून आल्याचे विभागाने नमूद केले आहे. ज्ञात मालमत्तेचे मूल्य १० कोटी ९९ लाख ८५ हजार ६१६ रुपये असल्याचेही तपासणीत समोर आले.

ज्ञात उत्पन्नाच्या स्रोतांच्या तुलनेत मालमत्ता व खर्चाची रक्कम १३ कोटी ३० लाख ८१ हजार ६९६ रुपये अधिक असल्याचे, म्हणजेच ज्ञात उत्पन्नाच्या सुमारे १०२ टक्के अधिक असल्याचे तपासणीत आढळून आल्याचे लाचलुचपत विभागाने म्हटले आहे.

या प्रकरणाचा तपास पोलिस उपअधीक्षक अजित त्रिपुटे करीत आहेत. या कारवाईबाबत दिलीपराव खेडकर यांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप प्राप्त झालेली नाही.

# धरणांच्या लाभक्षेत्रातील सिंचन व सामाजिक-आर्थिक बदलांचे सर्वेक्षण होणार

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील; गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक

● **छत्रपती संभाजीनगर । वीरभूमी–**

कृष्णा आणि गोदावरी खोऱ्यातील मोठ्या धरणांच्या लाभक्षेत्रात निर्माण झालेली सिंचनक्षमता, तसेच सिंचनामुळे झालेले आर्थिक व सामाजिक बदल यांचे सर्वेक्षण करण्यात येणार असल्याची माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

मराठवाडा गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व जिल्ह्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक सिंचन भवन येथे झाली. यावेळी महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी, अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, मुख्य अभियंता अरुण नाईक, सुनंदा जगताप यांच्यासह विविध जिल्ह्यांतील अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता तसेच नदीजोड प्रकल्पातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत प्रत्येक जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठ्याची स्थिती, भविष्यातील पाणी नियोजन, सिंचन प्रकल्पांच्या कामांची सद्यस्थिती आणि निधीची उपलब्धता यांचा आढावा घेण्यात आला.

सध्याची दुष्काळी परिस्थिती गंभीर असून, या परिस्थितीला संधी मानून सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले. जनतेला दिलासा देण्यासाठी जलसंपदा विभाग निश्चितपणे प्रयत्न करेल, असे सांगून उपलब्ध पाणीसाठ्यातून पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन उपलब्ध पाण्याचे नियोजन व नियंत्रण याबाबत समन्वय साधावा. तसेच लघुपाटबंधारे तलाव व मध्यम प्रकल्पांमधील बिगरसिंचन आरक्षण आणि बेकायदा पाणीउपसा रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाची मदत घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

लाभक्षेत्रातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नाबार्डच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील निधी उपलब्ध असून, त्याचा प्रभावी वापर करून प्रकल्प पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावे. प्रकल्पांचे आराखडे, ना-हरकत प्रमाणपत्रे आणि इतर आवश्यक बाबींवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

मोठ्या धरणांची कामे झाल्यानंतर त्यांच्या लाभक्षेत्रात किती सिंचनक्षमता निर्माण झाली किंवा पुनर्स्थापित झाली, याबाबतचा एकत्रित डाटा उपलब्ध नसल्याचे मंत्री विखे पाटील यांनी निदर्शनास आणले. तसेच सिंचनामुळे शेती उत्पादनात किती वाढ झाली आणि कृषी क्षेत्रातील बदलांमुळे आर्थिक व सामाजिक परिस्थितीत कोणते बदल झाले, याचाही सविस्तर अभ्यास झालेला नसल्याचे त्यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर गोखले इन्स्टिट्यूट किंवा टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या माध्यमातून जलसंपदा विभागाकडून लाभक्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जलसंपदा आणि कृषी विभागांमध्ये पुरेसा समन्वय नसल्याबद्दल मंत्री विखे पाटील यांनी खंत व्यक्त केली. धरणातील पाणीसाठा आणि पीक पद्धतीबाबत अचूक आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे विविध प्रश्नांवर आरोप-प्रत्यारोप होत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी कृषी क्षेत्राशी सुसंगत धोरण आखून जलसंपदा विभागाने काम करणे आवश्यक आहे. सिंचनाच्या माध्यमातून शेतीला पाठबळ



दिल्यास कृषी उत्पादन वाढण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

सध्याच्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणीपट्टी वसुलीबाबत जलसंपदा विभाग आग्रही भूमिका घेणार नसल्याचे मंत्री विखे पाटील यांनी स्पष्ट केले. मात्र भविष्यात पाणीपट्टी वसुलीसाठी सॅटेलाइट इमेजचा वापर करण्यात येणार असून, कोणत्या पिकासाठी किती पाण्याचा वापर झाला, याची शास्त्रशुद्ध माहिती उपलब्ध होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

महानगरपालिका, नगरपालिका आणि ग्रामपंचायतींकडून जलसंपदा विभागाची थकबाकी वसूल होत नसल्याने कार्यपद्धतीत बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत फ्लोटिंग सोलर प्रकल्प, पर्यटन धोरण, जलसंपदा विभागाच्या जागांवरील अतिक्रमणे हटविणे आणि कालवे अतिक्रमणमुक्त करण्यासह विविध विषयांचा जिल्हानिहाय आढावा घेण्यात आला. सकाळी दहा वाजल्यापासून मंत्री विखे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून विविध कामांची माहिती घेतली.

# SPOT NEWS



## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत एमपीएससीत यश मिळविल्याबद्दल मनिषा मातेरे यांचा सत्कार

**● निघोज । वीरभूमी –**

बाभुळवाडे येथील मनिषा गुलाबराव मातेरे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, वर्ग-१ या पदावर नियुक्ती मिळवल्याबद्दल बाभुळवाडे ग्रामस्थ आणि आपलं गाव फौंडेशनच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. मनिषा मातेरे यांचे वडील पुणे येथे रिक्षाचालक असून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. सुरुवातीला त्यांनी डी. एड.चे शिक्षण घेतले. मात्र नोकरी न मिळाल्याने त्यांनी शासनाची परीक्षा दिली आणि कॅनॉल इन्स्पेक्टर म्हणून सेवेत रुजू झाल्या. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली आणि त्यात यश मिळवले. सत्काराला उत्तर देताना मनिषा मातेरे म्हणाल्या, माझ्या या प्रवासात अनेक अडचणी आल्या; मात्र शिक्षणाची जिद्द कायम ठेवली. आज झालेल्या सत्काराने मी भारावून गेले आहे. माझे गाव म्हणजे माझे कुटुंब आहे. या कुटुंबाने मोठ्या आपुलकीने आणि डामडौलात माझा सत्कार करून मला सन्मानित केले. यावेळी आपलं गाव फौंडेशनचे अध्यक्ष डॉ. सुरेश खणकर, बाळासाहेब नवले, सोन्याबापू पोटे, दिगंबर जगदाळे, स्वप्नील जगदाळे, दत्तात्रय जगदाळे, भिवाजी जगदाळे, गणपत जगदाळे, शिवाजी बोरुडे, रजनीकांत जगदाळे, संतोष बोरुडे, संगिता जगदाळे, शोभा कोरडे, श्रीराम पवार, प्रल्हाद साळवे, संजय साळवे, शिवाजी जगदाळे, गुलाबराव नवले, अच्युतराव जगदाळे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मावा विक्री बंद न केल्यास ६ ऑक्टोबरपासून आमरण उपोषणाचा इशारा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीत मावा विक्री सर्रास सुरू असल्याचा आरोप करत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) महिला आघाडीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे तक्रार करण्यात आली आहे. मावा विक्रीवर तात्काळ कारवाई करून युवकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या प्रकाराला आळा घालावा, तसेच मावा विक्रीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची व त्यामागील यंत्रणेची सखोल चौकशी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. आरपीआय महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्षा ज्योती पवार यांच्या नेतृत्वाखाली महिलांच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन हे निवेदन दिले. यावेळी शितल नाटेकर, रेश्मा जाधव, प्रियंका पठारे, डॉ. सीताबाई भिंगारदिवे, जयाताई गायकवाड, आरती बडेकर, छायाताई बडेकर, अश्विनी झोंड, सुनीता घोडके, अनिता पंडित, शारदा बागुल आदी महिला उपस्थित होत्या. नगर शहरासह विविध भागांत मावा विक्रीवर निर्बंध असताना एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीत मावा विक्री कशाच्या आधारावर सुरू आहे, असा प्रश्न निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. या प्रकाराकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही महिला आघाडीने केला आहे. निवेदनात म्हटले आहे की, माव्याच्या व्यसनामुळे अनेक युवक त्याच्या आहारी जात असून आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. यापूर्वी मावा विक्रीवर पूर्णतः बंदी घालण्यात आली होती. मात्र, काही काळानंतर एमआयडीसी परिसरात पुन्हा मावा विक्री सुरू झाल्याने युवकांमध्ये मावा सेवनाचे प्रमाण वाढत असल्याचा दावा महिला आघाडीने केला आहे. मावा विक्री करणाऱ्या ठिकाणांचे तसेच मावा विक्रीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांचे फोटो आपल्याकडे पुरावा म्हणून असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधित वाहनांची चौकशी केल्यास मावा तयार करण्यासाठी लागणारे साहित्य, मशीन तसेच सुगंधी तंबाखूचा पुरवठा कुठून होतो, याचा शोध लागू शकतो. त्यामुळे केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई न करता मावा तयार करणारे अड्डे शोधून ते उद्ध्वस्त करण्याची मागणी महिला आघाडीने केली आहे. एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीतील मावा विक्री तातडीने बंद करण्यात यावी. युवकांच्या आरोग्याशी संबंधित या गंभीर प्रश्नावर पोलीस प्रशासनाने तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी ज्योती पवार यांनी केली.

# शेवगावात आंबेडकर चौक ते क्रांती चौक मार्गावर धुळीचा उच्छाद

### रस्त्याच्या कामामुळे नागरिक, विद्यार्थी व व्यापारी त्रस्त । नियमित पाणीफवारणीची मागणी

**● शेवगाव । वीरभूमी–**

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते क्रांती चौक या प्रमुख मार्गावर सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे गेल्या काही महिन्यांपासून नागरिकांना धुळीचा सामना करावा लागत आहे. वाहनांची सतत वर्दळ आणि रस्त्यावर साचलेल्या मातीमुळे वाहने जाताच धुळीचे लोट उठत असून, धूळ नियंत्रणासाठी नियमित पाणीफवारणी होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

या मार्गावर सकाळपासून रात्रीपर्यंत मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. शाळकरी विद्यार्थी, पादचारी, दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक तसेच रस्त्यालगतचे व्यापारी यांना दररोज धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः शाळा-महाविद्यालयांच्या वेळेत विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असताना वाहनांमुळे उडणाऱ्या धुळीमुळे त्यांची गैरसोय होत आहे.

रस्त्यालगतच्या व्यापाऱ्यांनाही धुळीचा मोठा फटका बसत आहे. दुकानांमध्ये धूळ शिरत असल्याने वारंवार साफसफाई करावी लागत असून, खाद्यपदार्थ, कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू व अन्य साहित्यावर धुळीचे थर साचत आहेत. धुळीच्या वातावरणामुळे ग्राहकांनाही त्रास होत असल्याने व्यापारावर परिणाम होत असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

रस्त्याचे काम सुरू असताना धूळ नियंत्रणासाठी नियमित पाणीफवारणी, बांधकाम साहित्याची योग्य हाताळणी आणि वाहतुकीच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक आहे. मात्र, या उपाययोजना पुरेशा प्रमाणात होत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. प्रशासनाने केवळ पाहणी न करता प्रत्यक्ष परिस्थितीची दखल घेऊन ठेकेदाराला आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणी होत आहे.

रस्त्यावर नियमित पाणीफवारणी करावी, धूळ नियंत्रणाच्या प्रभावी उपाययोजना कराव्यात, वाहतुकीला अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि काम जलदगतीने पूर्ण करावे, अशी मागणी नागरिक व व्यापाऱ्यांनी केली आहे.

#### धुळीमुळे आरोग्याचाही प्रश्न

■ या मार्गावर दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी, नागरिक व दुचाकीस्वार ये-जा करतात. वाहनांच्या वर्दळीमुळे हवेत उडणारी धूळ नागरिकांच्या आरोग्यास त्रासदायक ठरू शकते. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि धुळीचा त्रास असलेल्या व्यक्तींना याचा अधिक त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत नियमित पाणीफवारणी व प्रभावी धूळ नियंत्रण उपाययोजना करणे गरजेचे आहे.



## दिवाळीत शिर्डीत परीट धोबी समाजाचा वधू-वर परिचय मेळावा

### १५ नोव्हेंबरला आयोजन । वधू-वरांसह पालकांसाठी स्वतंत्र चर्चेची व्यवस्था

**● शिर्डी । वीरभूमी–**

साईबाबांच्या पावनभूमी शिर्डी येथे परीट धोबी समाजातील विवाहेच्छुकांसाठी वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. डेबूजी प्रतिष्ठाणच्या माध्यमातून व रेशीमगाठी वधू-वर मंडळ, पुणे यांच्या सहकार्याने १५ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता सिल्व्हर ओक लॉन्स, शिर्डी येथे हा मेळावा होणार आहे.

या मेळाव्यात पदवीधर तसेच पदवी नसलेले, विधवा, विधुर, घटस्फोटीत, परित्यक्ता, लॉन्ड्री व्यावसायिक, शेतकरी तसेच विविध क्षेत्रातील नोकरदार विवाहेच्छुकांना सहभागी होता येणार आहे. मेळाव्यासाठी वधू-वर नोंदणीला चांगला प्रतिसाद मिळत असल्याची माहिती डेबूजी प्रतिष्ठाणचे संस्थापक राजेंद्र फंड, अध्यक्ष सुनील निकम, उपाध्यक्ष माधवराव देसाई व खजिनदार सुधाकर वाघ यांनी दिली.

मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे वधू-वर तसेच पालकांना एकमेकांशी चर्चा करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्यक्ष भेट व संवादामुळे अपेक्षा समजून घेणे आणि योग्य जोडीदार निवडण्यास मदत होणार असून, एकमेकांकडे जाण्याचा वेळ व खर्चही वाचणार आहे.

मेळाव्याच्या आयोजनासाठी जिल्हा उपनिबंधक दिगंबर हौसारे, सहकार विभाग पुणे, अनिल देसाई, विलासराव रोकडे, डॉ. गणेश वाघ, सोपानराव भागवत, साईबाबा संस्थानचे उपकार्यकारी अभियंता किशोर गवळी, अनिलराव खडके, रेशीमगाठी वधू-वर मंडळाचे पदाधिकारी तसेच अमरावती, नाशिक, कोल्हापूर, सांगली, पिंपळगाव बसवंत, संभाजीनगर व धुळे येथील विविध मान्यवरांचे मार्गदर्शन लाभत आहे.

कायदेविषयक सल्लागार म्हणून ॲड. अमोल गवळी यांचेही सहकार्य मिळत आहे. समाजातील विवाहेच्छुकांनी या मेळाव्यात सहभागी होऊन नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## फोफसंडीच्या डोंगररांगांत सोनकीचा फुलोत्सव!

**● अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील सह्याद्रीच्या हरिश्चंद्रगडाच्या कुशीत वसलेल्या अतिदुर्गम फोफसंडी परिसरात सध्या निसर्गाचा मनमोहक रंगोत्सव सुरू झाला आहे. पावसाळ्यानंतर हिरवाईने नटलेल्या डोंगररांगा, माळरानांवर फुललेली पिवळ्याधमक सोनकीची फुले, विविध रंगांची रानफुले, खळाळून वाहणारे धबधबे आणि पक्ष्यांचा किलबिलाट यामुळे हा परिसर निसर्गप्रेमींचे लक्ष वेधून घेत आहे.



फोफसंडी परिसरातील कुंजरगड, मानखांदा, निरोळी टकोरी, रांजणा, घुबडी आणि बाळाई यांसह विविध माळरानांवर, डोंगरकड्यांवर आणि कडे-कपारींत रानफुलांची मनमोहक उधळण पाहायला मिळत आहे. सोनकीच्या पिवळ्या फुलांनी माळराने जणू पिवळ्या शालीने सजली आहेत. आभाळी, नभाळी, लेचुर्डी, पंधा अशा स्थानिक नावांनी ओळखल्या जाणाऱ्या रानफुलांसह विविध वनफुलांनी परिसराला रंगांची अनोखी झालर चढवली आहे.

डोंगरदऱ्यांतून खळाळत वाहणारे धबधबे, हिरव्यागार वनराईत मुक्तपणे विहरणारे पक्षी, फुलांवर बागडणारी रंगीबेरंगी फुलपाखरे आणि गुणगुणणारे कीटक यामुळे परिसरातील वातावरण प्रसन्न झाले आहे. निसर्गाचे हे मनमोहक रूप पर्यटक, निसर्गप्रेमी, छायाचित्रकार आणि भटकंतीप्रेमींना आकर्षित करत आहे.

फोफसंडी परिसर केवळ निसर्गसौंदर्याने समृद्ध नसून जैवविविधतेचा अनमोल ठेवा आहे. येथील माळराने, डोंगरकडे, दऱ्या आणि वनराईत फुललेली रानफुले सह्याद्रीच्या समृद्ध निसर्गाची साक्ष देतात.

सोनकीच्या फुलांचा हा रंगोत्सव म्हणजे निसर्गाने धरतीवर साकारलेला पिवळ्या फुलांचा गालिचाच जणू! फोफसंडीच्या या निसर्गवैभवाचा अनुभव घेण्यासाठी निसर्गप्रेमी आणि भटकंतीप्रेमींनी या परिसराला भेट द्यावी, असे आवाहन निसर्गप्रेमींकडून करण्यात येत आहे.

## धर्मनिरपेक्षता ही काळाची गरज : प्रा. कुमार आहेर

### 'मी सत्यशोधक महात्मा जोतिबा फुले बोलतोय' एकपात्री प्रयोगातून सामाजिक प्रबोधन

**● पारनेर । वीरभूमी –**

धर्मनिरपेक्षता, सामाजिक समता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ही आजच्या काळाची गरज असून, समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि विषमता दूर करण्यासाठी महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यासारख्या समाजसुधारकांचे विचार आत्मसात करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कलावंत प्रा. कुमार आहेर यांनी केले.

याप्रसंगी डॉ. मुदस्सीर सय्यद, मुख्याध्यापक संदिप महांडुळे, कवी रामदास भालेराव, लतिफ राजे, वसंत काळे, राजाराम वाघ, महेंद्र वाबळे, बाबासाहेब फंड, राधुजी चौधरी, प्रविणचंद्र गुंजाळ आणि पत्रकार भगवान गायकवाड आदी उपस्थित होते.

धन्वंतरी मेडिकल ॲण्ड एज्युकेशनल फाउंडेशन संचलित आश्रमशाळेत प्रसिद्ध नटश्रेष्ठ प्रा कुमार आहेर यांच्या नाट्यकलेतून साकारलेला 'मी सत्यशोधक महात्मा जोतिबा फुले बोलतोय' हा एकपात्री प्रयोग आयोजित करण्यात आला होता. या प्रयोगाला विद्यार्थी, शिक्षक व मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रा. आहेर यांनी आपल्या प्रभावी अभिनयातून महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवन कार्याचा आणि विचारांचा जीवनपट सजीव केला. तसेच सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे प्रभावी चित्रण केले. स्त्रीशिक्षण, सामाजिक समता, शोषित-वंचित घटकांसाठीचे कार्य आणि सत्यशोधक विचार यांचे महत्त्व त्यांनी प्रयोगातून अधोरेखित केले. प्रयोगा दरम्यान संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, फातिमा शेख आणि अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा संदर्भ देत सामाजिक परिवर्तनाच्या विविध पैलूंवर भाष्य केले. समाजात आढळणाऱ्या अंधश्रद्धा, रूढी-परंपरा आणि विषमतेवर प्रा. आहेर यांनी परखडपणे प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून प्रश्न विचारण्याची आणि विवेकबुद्धीने विचार करण्याची गरज स्पष्ट केली.

एकपात्री प्रयोगाच्या माध्यमातून इतिहासातील समाजसुधारकांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आले. अभिनय,



संवादफेक आणि आशयपूर्ण मांडणी यामुळे प्रयोगाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांना बळकटी देण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना सामाजिक सुधारणांचा इतिहास, महात्मा फुले दाम्पत्याचे कार्य आणि समाजप्रबोधनाची गरज यांची ओळख झाली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी प्रा. कुमार आहेर यांच्या प्रभावी एकपात्री प्रयोगाचे कौतुक केले.

# अकोले बाजार समितीच्या विकासाला गती देण्याची मागणी

### कोतुळ, समशेरपूर, राजूर येथे उपबाजार; पेट्रोल पंपांसह १३ कोटींच्या विकास प्रस्तावांवर भर

**● अकोले । वीरभूमी –**

अकोले कृषी उत्पन्न बाजार समितीची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्याबरोबरच कोतुळ, समशेरपूर व राजूर येथे उपबाजार सुरू करणे, पेट्रोल पंप सुरू करणे आणि विविध विकासकामांना गती देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

सभेच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे सभापती भानुदास पाटील तिकांडे होते. यावेळी आमदार डॉ. किरण लहामटे म्हणाले की, अकोले बाजार समितीच्या विकासाचा पॅटर्न राज्यासाठी आदर्श ठरेल. बाजार समितीत चांगले व्यापारी येत असल्याने आडत व्यवसायाला चालना मिळाली असून चालू वर्षी २२ लाख रुपयांचा नफा झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. कोतुळ, समशेरपूर व राजूर येथे उपबाजार सुरू झाल्यास शेतकऱ्यांना सुविधा मिळून बाजार समितीची उलाढाल वाढेल. बाजार समितीच्या विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना सर्वांनी सहकार्य करण्याची गरज असून, वीज बिल, कर्ज वसुली, पतसंस्थांची वसुली तसेच विद्यार्थ्यांच्या फीबाबत तगादा लावू नये, असे आवाहनही आमदार लहामटे यांनी केले. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे गरजेचे असून जनावरे, हिरडा, कडधान्य यांसह विविध कृषी मालाची बाजार समितीतील उलाढाल वाढविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी बाजार समितीच्या कामकाजाचे कौतुक करत कोतुळ येथील पेट्रोल पंपामुळे बाजार समितीच्या उत्पन्नात सुमारे ४८ लाख रुपयांची वाढ झाल्याचे सांगितले. राजूर व अकोले येथील पेट्रोल पंप सुरू झाल्यास उत्पन्नात आणखी वाढ होऊ शकते. मंजूर पेट्रोल पंप तातडीने सुरू करण्याची मागणी त्यांनी केली.

माजी सभापती पर्वतराव नाईकवाडी यांनी बाजार समितीच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधीची गरज असल्याचे सांगितले. तोलारखिंड रस्ता झाल्यास मुंबईतील व्यापाऱ्यांना अकोले बाजार समितीत येणे सोयीचे होईल आणि शेतमाल मुंबईच्या बाजारपेठेत जलद पोहोचेल, असे त्यांनी नमूद केले.

अशोकराव देशमुख यांनी कोतुळ, समशेरपूर व राजूर येथे उपबाजार सुरू झाल्यास बाजार समितीची उलाढाल वाढेल, असे सांगत कांदा व फ्लॉवर्स मार्केट सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी केली. शेतकऱ्यांनी चांगल्या प्रतीचा माल अकोले बाजार समितीत विक्रीस आणावा, असे आवाहनही त्यांनी केले.

सभापती भानुदास पाटील तिकांडे यांनी बाजार समितीच्या तीन वर्षांच्या कामकाजाचा आढावा घेतला. सभासदांचा विश्वास, कर्मचारी वर्गाचे प्रयत्न आणि संचालक मंडळाच्या सहकार्यामुळे संस्थेने प्रगती केली असून बाजार समितीला चालू वर्षी 'अ' वर्ग मिळाल्याचे त्यांनी सांगितले. या कामगिरीची दखल घेत महाराष्ट्र राज्य कृषी सहकारी संघाचा वसंतराव दादा पाटील स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार बाजार समितीला जाहीर झाल्याची माहिती त्यांनी दिली.

बाजार समितीने शासनाकडे सुमारे १३ कोटी रुपयांचे विकास प्रस्ताव सादर केले आहेत. अकोले व राजूर येथील पेट्रोल पंपांना मंजुरी मिळाली असली तरी न्यायालयीन नोटिफिकेशनमुळे ते सुरू करता आले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महिला बचत गटांना व्यवसायासाठी मदत करण्याचेही त्यांनी सांगितले. माजी व्यवस्थापक भाऊसाहेब शेणकर यांनी बाजार समितीच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा आढावा घेतला. दीड लाख रुपयांच्या व्यवसायापासून सुरू झालेली संस्था आज सुमारे दीड कोटी रुपयांपर्यंत व्यवसाय करत असल्याचे त्यांनी नमूद केले.



सभेपूर्वी दिवंगत मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कांदा व भाजीपाला मोठ्या प्रमाणात बाजार समितीत आणणाऱ्या शेतकऱ्यांचा, हमाल-मापाडी तसेच आडते व व्यापारी वर्गातील मान्यवरांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

सभेला उपसभापती रोहिदास भोर, संदीपराव शेटे, भाऊसाहेब कासार, सुभाष काकड, बाळासाहेब सावंत, निता आवारी, अनिल कोळपकर, गंगाराम पापळ, शांताराम नेहे, साहेबराव देवकर, ईश्वर वाकचौरे, योगेश आरोटे, रूपाली कचरे, भास्करराव खांडगे, सचिन रंधे, स्वाती कोरडे, मंगल भांगरे, रामकृष्ण आवारी, भाऊसाहेब नाईकवाडी, तुकाराम खाडे, अब्दुल इनामदार, किरण कानकाटे, मारुती वैद्य, सचिव राजेंद्र जगताप यांच्यासह सभासद व मान्यवर उपस्थित होते. स्वागत व सूत्रसंचालन ज्येष्ठ संचालक बाळासाहेब सावंत यांनी केले. प्रास्ताविक भास्करराव खांडगे यांनी केले. उत्पन्न-खर्च ताळेबंद, वार्षिक अहवाल व लेखापरीक्षण अहवालाचे वाचन व्यवस्थापक राजेंद्र जगताप यांनी केले. आभार भाऊसाहेब नाईकवाडी यांनी मानले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS



## कोंडारवाडी शाळेत पर्यावरण विषयक चित्रकला स्पर्धा

**● अकोले । वीरभूमी –**

जिल्हा परिषद शाळा, कोंडारवाडी येथे पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांच्या पुढाकारातून पर्यावरण विषयक चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धन, स्वच्छता व निसर्गरक्षणाचा संदेश चित्रांतून मांडला. लहान वयातच पर्यावरणाची जाणीव निर्माण करून भविष्यातील पर्यावरणरक्षक पिढी घडविणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. पृथ्वीचे वाढते तापमान ही आज जगासमोरील गंभीर समस्या आहे. त्यामुळे पर्यावरणाबाबत केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृती करणारी पिढी घडविणे आवश्यक आहे. शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी प्रेम, संवेदनशीलता आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. कार्यक्रमास केंद्रप्रमुख काळू भांगरे, सरपंच यमाजी भांगरे, संजय भांगरे, मुख्याध्यापक संदीप बांबळे, रवींद्र दिघे, लता गोंदके, भरत बांबळे, सुखदेव देठे तसेच ग्रामसेविका देशमुख मॅडम उपस्थित होत्या. यावेळी उद्योजक यशवंत चौथवे यांनी मुलांना मिष्टांग अल्पोहर दिला. अशा कृतीयुक्त पर्यावरणपूरक उपक्रमांची सुरुवात आता प्रत्येक शाळेत नक्कीच होईल आणि त्यातून पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक होईल.

## कावेरी घोलप यांचा सन्मान राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानित



**● अकोले । वीरभूमी–**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत अहिल्यानगर येथील श्रीमती कावेरी दिनेश घोलप यांना 'राजमाता जिजाऊ समाजभूषण पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. हा पुरस्कार संगीत, शिक्षण, कला, साहित्य, सामाजिक कार्य, आरोग्य, उद्योग, पर्यावरण आणि सांस्कृतिक क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जपत कावेरी घोलप यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या बहुआयामी सामाजिक योगदानाची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आला. रानकवी प्रतिष्ठान व ज्ञानाई फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १०० वे राज्यस्तरीय पुणे मराठी काव्य संमेलन महात्मा फुले सांस्कृतिक भवन, प्रतिमा नगर, पुणे येथे नुकतेच संपन्न झाले. याच कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कावेरी घोलप यांच्या सामाजिक व विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे.

## राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेत राजलक्ष्मीचे यश

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

येथील भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलची इयत्ता नववीची विद्यार्थिनी कु. राजलक्ष्मी अशोक घडेकर हिने भोपाळ (मध्य प्रदेश) येथे राष्ट्रीय रायफल असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या वतीने आयोजित २८ व्या कुमार सुरेंद्र सिंग आंतरशालेय राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेत तिने हजारो स्पर्धकांमधून राष्ट्रीय रँक मिळवला असून, तिने ३७२ गुणांक प्राप्त केला आहे. विशेष म्हणजे राजलक्ष्मीने रायफल शूटिंगचा सराव केवळ मागील आठ महिन्यांपासून सुरू केला आहे. या अल्प कालावधीत तिने जिल्हास्तरीय स्पर्धेत मेडल मिळवले, त्यानंतर राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली आणि आता राष्ट्रीय स्तरावरही उल्लेखनीय यश संपादन केले. रायफल शूटिंग हा एकाग्रता, अचूकता, संयम आणि मानसिक स्थैर्याची आवश्यकता असलेला खेळ असून, अल्पावधीत तिने या खेळातील कौशल्य आत्मसात केले आहे. गोवा येथे झालेल्या १३ व्या वेस्ट झोन रायफल शूटिंग चॅम्पियनशिपमध्ये तिने अजिंक्यपद पटकावले आहे. राजलक्ष्मीने अहिल्यानगर सिटी रायफल अँड पिस्तोल स्पोर्ट्स शूटिंग क्लब येथे प्रशिक्षण घेतले असून तिला प्रशिक्षक आलिम शेख, छबुराव काळे आदींचे मार्गदर्शन लाभले. रायफल शूटिंगमध्ये अचूक नेम साधण्यासाठी एकाग्रता अत्यंत महत्त्वाची असते. एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीमध्ये अबॅकसच्या सततच्या सरावामुळे माझी एकाग्रता वाढण्यास मदत झाली आणि त्याचा फायदा मला रायफल शूटिंगमध्ये झाला. त्यामुळे अकॅडमीच्या माझ्या सर्व शिक्षिकांची मी आभारी आहे.

# बाजार समिती ही शेतकरी-व्यापाऱ्यांमधील महत्त्वाचा दुवा

### माजी आमदार चंद्रशेखर घुले । शेवगाव बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा

**● शेवगाव । वीरभूमी –**

बाजार समिती ही शेतकरी आणि व्यापारी यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पारदर्शक व्यवहार, योग्य बाजारभाव, मूलभूत सुविधा तसेच शेतमाल विक्रीसाठी सुलभ व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन माजी आमदार चंद्रशेखर घुले यांनी केले.

शेवगाव तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी घुले बोलत होते. सभेस शेवगाव पंचायत समितीचे माजी सभापती डॉ. क्षितिज घुले, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे, बाजार समितीचे सभापती हनुमान पातकळ, बबनराव भुसारी, पंडित भोसले, वसंतराव लांडे गुरुजी, उपसभापती अशोक धस, कैलास नेमाने, सुधाकर लांडे, ताहेर पटेल, एजाज काझी आदी उपस्थित होते.



घुले म्हणाले की, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देतानाच त्यांच्या शेतमालाला योग्य बाजारपेठ आणि दर मिळवून देण्यासाठी संचालक मंडळाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. बदलत्या कृषी क्षेत्राचा विचार करून भविष्यातील गरजांनुसार बाजार समितीच्या कामकाजात आवश्यक सुधारणा कराव्यात.

यंदा पावसाअभावी दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांना पशुधन वाचविण्यासह शेतीशी संबंधित अडचणींमधून दिलासा मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे घुले यांनी सांगितले.

सभेदरम्यान बाजार समितीच्या वार्षिक कामकाजासह शेतकरी व व्यापाऱ्यांशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. बाजार समितीच्या भविष्यातील विकासासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत उपस्थितांनी सूचना मांडल्या. सभासदांच्या सूचना व अडचणींचा विचार करून सकारात्मक निर्णय घेण्याची भूमिका संचालक मंडळाने घेतली.

यावेळी बाळासाहेब वडघणे, बाळासाहेब ढाकणे, अनिल मडके, प्रदीप काळे, नाना मडके, विजय देशमुख, अरुण घाडगे, जगदीश धूत, निलेश रोकडे, भारत मोटकर, सचिन फटांगरे, मिलिंद गायकवाड, दत्तात्रय फुंदे, संजय नांगरे, कैलास देहडराय यांच्यासह बाजार समितीचे संचालक मंडळ, तालुका खरेदी-विक्री संघाचे संचालक, व्यापारी, हमाल, मापाडी, शेतकरी, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि बाजार समितीचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सभापती हनुमान पातकळ यांनी केले. सूत्रसंचालन संजय कोळगे यांनी केले, तर सचिव मुद्दसर शेख यांनी आभार मानले.

## संजय आनंदकर स्पोर्ट्स अकॅडमीच्या श्रीगोंद्यातील १७ खेळाडूंची विभागीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड

### १७ सुवर्ण, ७ रौप्य आणि १२ कांस्य पदकांची कमाई

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत श्रीगोंद्याच्या संजय आनंदकर स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी पदकांची लयलूट करीत आपले वर्चस्व सिद्ध केले. तब्बल १७ सुवर्ण, ७ रौप्य आणि १२ कांस्य अशी एकूण ३६ पदके पटकावत अकॅडमीने उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या १७ खेळाडूंची पुणे विभागीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या वतीने महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा येथे शालेय जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धा २०२६-२७ आयोजित करण्यात आली होती. जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधील ९६६ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला. चुरशीच्या लढतींमध्ये संजय आनंदकर स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट तंत्र, वेग, कौशल्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर घवघवीत यश मिळविले.या स्पर्धेत सुवर्णपदक मिळविणाऱ्या खेळाडूंची ४ व ५ ऑक्टोबर रोजी न्यू इंग्लिश स्कूल, लांडेवाडी, पुणे येथे होणाऱ्या पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

ऋतिका अशोक दातीर, ज्ञानेश्वरी भरत खेडकर, गायत्री सतीश भुजबळ, प्राजक्ता राजू तरटे, शर्वरी सूर्यभान गोलांडे, यश राजेंद्र खाकाळ, विराज विठ्ठल बरबडे, अर्णव गोविंद वाघ, ओंकार बाबासाहेब ननावरे, कृष्णा माणिक खेडकर, अंकित शहाजी खामकर, प्रणव गंगाधर रायकर, नीरज राजेंद्र जैन, ऋतुराज प्रकाश थीटे, वरद किरण काळे, अमरजीत प्रवीण बळे आणि प्रज्वल सुनील ढवळे.

खेळाडूंचा नियमित सराव, शिस्त, मेहनत आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश मिळाल्याचे प्रशिक्षक जयेश आनंदकर व सिद्धेश आनंदकर यांनी सांगितले. विभागीय स्पर्धेतही खेळाडू उत्तम कामगिरी करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या यशाबद्दल आ. विक्रमसिंह पाचपुते, ज्येष्ठ नेते घनश्याम शेलार, बाबासाहेब भोस, माजी आ. राहुल जगताप, राजेंद्र नागवडे आणि जिल्हा तायक्वांदो संघटनेचे अध्यक्ष तथा ग्रँडमास्टर संजय आनंदकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

## कर्तव्यनिष्ठ फार्मासिस्ट घडविणे ही काळाची गरज

### औषध निरीक्षक. सोमनाथ मुळे । आर जे एस फार्मसी कॉलेजमध्ये फार्मासिस्ट दिन साजरा

**● कोपरगाव । वीरभूमी–**



समाजाच्या आरोग्याची जबाबदारी पार पाडताना प्रत्येक फार्मासिस्टने आपले कार्य प्रामाणिकपणे आणि कर्तव्यनिष्ठेने करणे आवश्यक आहे. फार्मसी हा केवळ पैसे कमावण्याचा व्यवसाय नसून लोकांच्या आरोग्याशी निगडित महत्त्वाचे सेवाक्षेत्र आहे. विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त राहून जबाबदारीची जाणीव ठेवत फार्मसी व्यवसायातील नैतिक मूल्ये अंगीकारावीत,असे प्रतिपादन, अहिल्यानगरचे औषध निरीक्षक सोमनाथ मुळे यांनी केले.

राष्ट्रसंत जनार्दन स्वामी कॉलेज ऑफ फार्मसी, कोकमठाण येथे निरोगी भविष्यासाठी औषधनिर्मात्यांचे सक्षमीकरणया संकल्पनेअंतर्गत जागतिक फार्मासिस्ट दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी सोमनाथ मुळे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करत होते.यावेळी सोमनाथ मुळे यांनी विद्यार्थ्यांना गरुडाच्या भरारीचे उदाहरण देत जीवनात मोठी ध्येये ठेवण्याचा संदेश दिला. गरुडाची आई आपल्या पिल्लाला उंच आकाशात भरारी घेण्यास शिकवते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने मोठी स्वप्ने पाहून आपल्या जीवनात यशाची भरारी घ्यावी. असे त्यांनी सांगितले.

यावेळी प्राचार्य डॉ. नितीन जैन यांनी फार्मासिस्ट दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, फार्मासिस्ट दिन हा आरोग्यसेवेत फार्मासिस्टच्या महत्त्वपूर्ण योगदानाची जाणीव करून देणारा दिवस आहे. विद्यार्थ्यांनी फॉर्मसी व्यवसायातील प्रामाणिकपणा, नैतिकता, सेवाभाव, व्यसनमुक्त जीवन आणि समाजाच्या आरोग्याप्रती असलेली जबाबदारी अंगीकारणे आवश्यक आहे.

यावेळी संस्थेचे सचिव प्रसादजी कातकडे, उद्योजक विजय कडू, इंजिनिअर मा. दीपक कोटमे व मा. प्रणित कातकडे यांनी जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त सर्व फार्मासिस्ट, शिक्षक, विद्यार्थी व फार्मसी क्षेत्राशी संबंधित व्यक्तींना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. फार्मासिस्ट हा आरोग्यसेवेतील महत्त्वाचा घटक असून, समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीने त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्य, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव या मूल्यांच्या आधारे भविष्यात कर्तव्यनिष्ठ फार्मासिस्ट म्हणून कार्य करावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्रा. सोनाली कोते, प्रा. पूजा जाधव, प्रा. वैभव गाढवे, प्रा. डॉ. विजय जाधव, प्रा. डॉ. सचिन आगलावे, प्रा. डॉ. सुवर्णा थोरात, प्रा. सचिन चव्हाण, प्रा. उत्कर्ष लासुर, प्रा. कावेरी चौधरी, प्रा. प्राची सोमवंशी, प्रा. वैष्णवी लोखंडे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गौतम पॉलिटेक्निकमध्ये रोजगार मेळावा उत्साहात संपन्न

### २० कंपन्या, ७०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग । मुलाखती व निवड पत्रांचे वितरण

**● कोपरगाव । वीरभूमी –**

ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींना एकाच छताखाली रोजगाराच्या व करिअरच्या विविध संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने संस्थेच्या सचिव सौ. चैतालीताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली गौतम एज्युकेशन सोसायटी संचालित गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट व कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ मंगळवार (दि.२९) रोजी गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट, कोळपेवाडी येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

मेळाव्याचे उद्घाटन कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त सुनील बोरा यांच्या हस्ते पार पडले. यावेळी सोसायटीचे विश्वस्त मुस्ताक पटेल, अहिल्यानगर रोजगार महाकुंभ समन्वयक परितोष दरपेल, संस्थेचे इन्स्पेक्टर नारायण बारे, गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटचे प्राचार्य वसीम शेख, कार्यालयीन अधीक्षक अण्णासाहेब बढे, न्यू इंग्लिश स्कूल देर्डे प्राचार्य प्रकाश देशमुख, सर्व विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते.

रोजगार मेळाव्यात राज्यासह देशातील २० हून अधिक नामांकित कंपन्यांसह १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा तसेच सर्व शाखांतील पदवीधर व पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या ७०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कंपन्यांच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता, कौशल्ये व क्षमतांच्या आधारे मुलाखती घेतल्या. पात्र विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया पूर्ण करून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना निवडपत्रांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये नोकरीसह ॲप्रेंटिसशिपच्या संधी देखील मिळाल्या आहे.



ग्रामीण भागातील तरुणांच्या हाताला काम मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या करिअरला नवी सुरुवात करून देण्यासाठी हा रोजगार महाकुंभ अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला असून रोजगार मेळाव्यामुळे विद्यार्थ्यांना विविध उद्योग व कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याची, प्रत्यक्ष मुलाखतीचा अनुभव घेण्याची तसेच आपल्या कौशल्यांना अनुरूप रोजगाराच्या संधी जाणून घेण्याची संधी मिळाली. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींना एकाच छताखाली रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध झाल्या असून उमेदवारांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

रोजगार मेळाव्यात सहभागी होणारे सर्व मान्यवर, कंपन्यांचे प्रतिनिधी, अहिल्यानगर रोजगार महाकुंभचे पदाधिकारी, संस्थेचे अधिकारी, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व उत्स्फूर्त सहभाग नोंदविणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत विवेकानंद विद्या मंदिरचे घवघवीत यश

### २६ खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड । विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

**● पाथर्डी । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पाथर्डी तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पाथर्डी येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या मैदानावर नुकत्याच तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत पाथर्डी शहरातील श्री विवेकानंद विद्या मंदिर विद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारांत यश संपादन केले. विद्यालयातील तब्बल २६ खेळाडूंची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

**मुलींच्या १४ व १७ वर्षे वयोगटात :**

१०० मीटर धावणे – प्रथम क्रमांक : रणाते अनुष्का सुनील; ६०० मीटर धावणे – प्रथम क्रमांक : ससे ईश्वरी संभाजी; गोळा फेक – प्रथम क्रमांक : सय्यद नुसरत इरफान; लांब उडी – प्रथम क्रमांक : ढाकणे पंकजा शिवाजी.

४ बाय १०० मीटर रिले – प्रथम क्रमांक : गर्जे वैष्णवी राजेंद्र, जेथे अंजली तात्यासाहेब, मरकड आरती कानिफनाथ, आंधळे अंजली झुंबर, मरकड अनुजा भाऊसाहेब. उंच उडी – प्रथम क्रमांक : ढाकणे पंकजा शिवाजी.

१०० बाय ४ मीटर रिले – प्रथम क्रमांक : रणाते अनुष्का सुनील, ठोंबरे अनुजा दादासाहेब, ठोंबरे अनुराधा सोमनाथ, मृणाल मारुती गोरक्ष, शेंबडे साक्षी.

**मुलांच्या १४ व १७ वर्षे वयोगटात :**

१०० बाय ४ मीटर रिले – प्रथम क्रमांक : रोडी श्रेयस सतीश, गव्हाणे कार्तिक दत्तात्रय, माळवे सर्वज्ञ अनिल, कुलट श्रेयश शाम, सार्थक अशोक घुले.

४०० मीटर धावणे – प्रथम क्रमांक : पालवे गणेश प्रदीप; उंच उडी – द्वितीय क्रमांक : वेदांत धायतडक; उंच उडी – प्रथम क्रमांक : दिंडे साहिल ज्ञानेश्वर.

या सर्व यशस्वी खेळाडूंचे पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष ॲड. सुरेशराव आव्हाड, विश्वस्त इंजि. कुणाल आव्हाड, मुख्याध्यापक शरद मेढे, समन्वयक ज्ञानेश्वर गायके आणि पर्यवेक्षक संपत घारे यांच्यासह विद्यार्थ्यांच्या पालकांनी अभिनंदन करून पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत.

सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रमोद हंडाळ, सतीश डोळे आणि गौरव दाणे यांचे मार्गदर्शन लाभले.



# मोहटादेवी नवरात्रोत्सवासाठी प्रशासन सज्ज; भाविकांच्या सुविधांना प्राधान्य

## रस्ते अतिक्रमणमुक्त करण्याचे आदेश । २४ तास जादा बससेवा व कडेकोट बंदोबस्ताचे नियोजन

**● पाथर्डी । वीरभूमी–**

**श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानचा शारदीय नवरात्र महोत्सव दि. ११ ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होत असून, त्याच्या पार्श्वभूमीवर मोहटा देवस्थानच्या सभागृहात आढावा बैठक झाली. उपविभागीय अधिकारी तथा श्री मोहटादेवी यात्रा नोडल ऑफिसर प्रसाद मते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महोत्सवाच्या नियोजनाचा आढावा घेऊन विविध शासकीय विभागांना दिलेल्या जबाबदाऱ्याचा आढावा घेण्यात आला.**




नवरात्र महोत्सव काळात भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी रस्ते, वाहतूक, वीज, पाणी, आरोग्य व सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन करण्यात आले. देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी आवश्यक कामांची माहिती दिली. शारदीय नवरात्र काळात गाभारा दर्शन बंद राहणार असल्याचे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले.

घटस्थापना व पालखी मिरवणुकीसाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त, महिला पोलीस, वाहतूक पोलीस, एस.आर.पी., गृहरक्षक दल व शीघ्रकृती दल तैनात करण्यात येणार आहे. तसेच पाथर्डी शहरासह मोहटादेवीकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविण्याचे आदेश प्रसाद मते यांनी दिले. मोहटादेवी रस्त्यावरील वनविभागाच्या जागेतील अतिक्रमण न हटवल्याने संबंधित विभागाला नोटीस देण्याचे आदेशही देण्यात आले.

बैठकीस अनुपस्थित राहिल्याबद्दल वनपरीक्षेत्र अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, राष्ट्रीय महामार्ग विभाग व गटविकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्याचे निर्देश देण्यात आले.

मोहटादेवीकडे येणाऱ्या रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, साइडपट्ट्यांची दुरुस्ती, आवश्यक ठिकाणी स्पीड ब्रेकर, पुरेशी प्रकाशव्यवस्था, २४ तास वीजपुरवठा, पिण्याचे पाणी, अग्निशमन वाहन, फिरते शौचालय तसेच आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. रुग्णवाहिका व २४ तास ओपीडी सुरू ठेवण्याचेही नियोजन करण्यात आले आहे. पाथर्डी आगाराच्या वतीने २४ तास जादा बसेस उपलब्ध करून देण्यात येणार असून, भाविकांसाठी सुलभ दर्शन व वाहतूक व्यवस्था करण्यात येणार आहे.

बैठकीस तहसीलदार उद्धव नाईक, सहायक पोलीस निरीक्षक रोहन खंडागळे, श्री. सी. लाड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता श्री. सय्यद, महावितरणचे उपअभियंता अरविंद कुकडे, देवस्थानचे विश्वस्त शशिकांत दहिफळे, अशोक दहिफळे, ॲड. विक्रम वाडेकर, बाळासाहेब लाहोटी, बाबासाहेब दहिफळे, सरपंच मनिषा पालवे, तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रास्ताविक ॲड. विक्रम वाडेकर यांनी केले तर ईश्वर गायकवाड यांनी आभार मानले.

### मोहरी मार्गे असलेल्या रस्त्याकडेही लक्ष द्या

■ मोहटादेवी गडाकडे जाणारा जवळचा व पर्यायी रस्ता म्हणून वापरण्यात येणारा मोहरी मार्गे असलेला रस्ता. या रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय आहे. पायी येणारे लाखों भाविक ही या रस्त्याचा वापर करतात. या रस्त्याची अवजड व अवैध वाहतुकीमुळे पुर्ण दुरावस्था झाली आहे. यात्रा काळात गर्दीच्या वेळी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी या रस्त्याचा वापर होत असल्याचे सांगत हा रस्ता दुरुस्त झाला नाही तर अपघाताची शक्यता नाकरता येत नाही त्यामुळे या रस्त्याकडे ही प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. अशी मागणी भाजपचे युवा मोर्चाचे शहराध्यक्ष बबलू खोर्दे यांनी दैनिक वीरभूमीशी बोलताना केली आहे.

---

# मनःशांती, पवित्र विचारांतच खरा ‘स्वर्ग’

## ब्रह्माकुमारी साधना दीदी । मनुष्य जीवन व आत्म्याच्या आध्यात्मिक प्रवासावर चिंतन

**● पारनेर । वीरभूमी–**



मनुष्याच्या विचारांमध्ये, कर्मांमध्ये आणि परस्परांच्या व्यवहारातच सुख-दुःखाची अनुभूती निर्माण होत असते. बाह्य संपत्तीपेक्षा मनःशांती, समाधान, पवित्र विचार आणि दैवी संस्कार हेच खऱ्या स्वर्गाचे स्वरूप आहे, असे प्रतिपादन प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर सेंटरच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दीदी यांनी केले.

अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त आयोजित सकाळच्या मुरली वाचन कार्यक्रमात ‘मनुष्याचे जीवन आणि आत्म्याचा आध्यात्मिक प्रवास’ या विषयावर त्या मार्गदर्शन करत होत्या.

वर्तमान काळाला महान कलियुग म्हणून संबोधले जात असून, मनुष्याच्या जीवनातील दैवी गुणांचा ऱ्हास आणि धर्म-कर्मातील अधोगती याबाबत त्यांनी आध्यात्मिक दृष्टिकोनातून विचार मांडले. यावेळी त्यांनी भगवद्गीतेतील ‘यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत’ या वचनाचा संदर्भ दिला. परमपिता परमात्मा शिव यांच्या अवतरणाची संकल्पना स्पष्ट करताना सत्य, प्रेम, शांती, पवित्रता, नम्रता आणि सद्भावना हे दैवी गुण जीवनात आत्मसात करण्याचा संदेश त्यांनी दिला.

‘स्वर्ग नेमका कुठे आहे आणि नरक म्हणजे काय?’ या प्रश्नावर बोलताना साधना दीदी यांनी सांगितले की, स्वर्ग-नरकाची संकल्पना केवळ मृत्यूनंतरच्या अवस्थेशी जोडण्याऐवजी मनुष्याच्या वर्तमान जीवनातील विचार, आचार आणि व्यवहारातूनही त्याकडे पाहता येते. प्रेमळ, स्नेहपूर्ण आणि सुखदायी व्यवहारातून जीवन आनंदमय होऊ शकते. केवळ धनवान व्यक्ती सुखात असल्याने ती ‘स्वर्गात’ आणि गरीब व्यक्ती दुःखात असल्याने ती ‘नरकात’ आहे, असे मानणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

‘आपण कोण आहोत? ईश्वर या धरतीवर कधी येतात? मनुष्य जीवनाचा उद्देश काय? स्वर्ग आणि नरकाची वास्तविक संकल्पना काय?’ या प्रश्नांचा आध्यात्मिक अभ्यास करण्यासाठी ब्रह्माकुमारी केंद्रात येऊन ज्ञान व राजयोगाचा परिचय करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

---

## अकोले रोटरी क्लब व लालतारा मेडिकलच्यावतीने मोफत रक्तदाब, मधुमेह तपासणीला उत्स्फूर्त प्रतिसाद



**● अकोले । वीरभूमी–**

रोटरी क्लब अकोले सेंट्रल आणि लालतारा मेडिकल यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या मोफत रक्तदाब व मधुमेह तपासणी अभियानाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. गणेशोत्सव ते नवरात्रोत्सव या कालावधीत बाजारतळाशेजारील लालतारा मेडिकलसमोरील प्रांगणात हे अभियान सुरू आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर आणि कामगार कामाच्या व्यापामुळे तसेच आरोग्याची काळजी कशी घ्यावी, याबाबत पुरेशी माहिती नसल्यामुळे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. वेळोवेळी आरोग्य तपासणी न केल्यास भविष्यात विविध आरोग्यविषयक समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे रक्तदाब आणि मधुमेहासारख्या आजारांचे वेळेत निदान व्हावे, या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे.

गणेशोत्सवाच्या काळात अभियानाचे उद्घाटन झाले. गेल्या पाच दिवसांत सुमारे ३०० नागरिकांनी मोफत तपासणीचा लाभ घेतला. या मोफत रक्तदाब व मधुमेह तपासणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन रोटरीचे अध्यक्ष गंगाराम करवर, सेक्रेटरी सचिन आहेर, उपाध्यक्ष संदीप भोर, सहसचिव परमानंद शिंदे, खजिनदार प्राचार्य डॉ. संजय ताकटे, ह.भ.प. दीपक महाराज देशमुख, डिस्ट्रिक्ट टीआरएफ असोसिएट डायरेक्टर प्राचार्य विद्याचंद्र सातपुते, सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच लालतारा मेडिकलचे संचालक सचिन आवारी यांनी केले आहे.

---

# एस.एस.जी.एम.कॉलेज मध्ये कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा उत्साहात साजरा

**● कोपरगाव । वीरभूमी–**



रयत शिक्षण संस्थेचे, श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स व संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव येथे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जयंतीनिमित्त रयत माउली कृतज्ञता दिन’ उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक डॉ. सुनिता आत्रे यांनी केले. उपस्थित मान्यवरांचा सत्कार अध्यक्ष डॉ. भगत सर यांच्या हस्ते करण्यात आला. संगीता मालकर, किरण डागा, विमल पुंडे,कावेरी राऊत,किरण जपे, नूतन सरोदे मॅडम, डॉ. सोनल वाबळे आणि डॉ. मंजुषा वाकचौरे यावेळी उपस्थित होत्या. समाजसेविका संगीता मालकर यांनी वर्तनातील बदल हा कृतीतून घडतो असे प्रतिपादन केले. किरण डागा यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव द्यावा हे सांगितले. विमलताई पुंडे यांनी योग व प्राणायाम याचे महत्व पटवून दिले. डॉ. मंजुषा वाकचौरे यांनी स्वःतचे अस्तित्व निर्माण करण्यास सांगितले.

सदर कार्यक्रमासाठी पर्यवेक्षक माधव रेवगडे, विज्ञान, वाणिज्य व कला विभागातील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. भगत यांनी अध्यक्षस्थान भूषवले. अध्यक्षीय मनोगतात कर्तृत्ववान महिला म्हणजे आपली आई आहे, तिचा सन्मान नेहमी केला पाहिजे,असे विचार मांडले. या कार्यक्रमाचे आभार विद्या देवकर यांनी मानले. सूत्रसंचालन जयश्री शेंडगे यांनी केले.

---

# सोन्याच्या पेंडलपेक्षा माणुसकीला दिले महत्त्व!

## सुभान तांबोळी यांचा प्रामाणिकपणा । सापडलेले ४० हजारांचे पेंडल मालकाला परत



**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

सोन्याच्या दागिन्याचे मोल पैशांत करता येते; मात्र प्रामाणिकपणा आणि माणुसकीचे मोल पैशांत करता येत नाही. याचा प्रत्यय आढळगाव येथे आला. सामाजिक कार्यकर्ते सुभान तांबोळी यांना सापडलेले अंदाजे ३० ते ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे पेंडल त्यांनी कोणताही स्वार्थ न ठेवता त्याचे मालक सचिन निघून यांना परत केले. त्यांच्या या कृतीचे परिसरातून कौतुक होत आहे.

काही दिवसांपूर्वी सुभान तांबोळी यांना सोन्याचे गळ्यातील पेंडल सापडले. मौल्यवान वस्तू सापडल्यानंतर ती स्वतःकडे ठेवण्याचा मोह होऊ शकतो; मात्र तांबोळी यांनी त्याकडे वेगळ्या नजरेने पाहिले. ही वस्तू आपली नसून ती तिच्या खऱ्या मालकापर्यंत पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे, या भावनेतून त्यांनी मालकाचा शोध घेण्याचा निर्णय घेतला.

चौकशीअंती हे पेंडल सचिन निघून यांचे असल्याचे समोर आले. त्यानंतर तांबोळी यांनी ते पेंडल निघून यांच्या स्वाधीन केले. हजारो रुपयांचे मूल्य असलेल्या वस्तूपेक्षा प्रामाणिकपणाला महत्त्व देणाऱ्या त्यांच्या या कृतीने माणुसकीचा साधा, पण महत्त्वाचा आदर्श घालून दिला.

आजच्या धावपळीच्या जीवनात स्वार्थापेक्षा दुसऱ्याच्या विश्वासाला आणि हक्काला महत्त्व देणाऱ्या अशा कृती समाजात विश्वासाचे नाते अधिक दृढ करतात.

सुभान तांबोळी यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणामुळे आढळगाव परिसरात त्यांचे कौतुक होत असून, त्यांच्या कृतीतून इतरांनाही प्रेरणा मिळत आहे.

---

# मराठी शाळांतील विद्यार्थ्यांना तातडीने सुविधा द्या

## पायाभूत सुविधांसह शिक्षक उपलब्धतेसाठी ग्राहक पंचायतीचे गटशिक्षण अधिकाऱ्यांना निवेदन

**● अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील विविध गावांमधील मोडकळीस आलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती करावी, तसेच नवीन वर्गखोल्या, पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छतागृह आदी मूलभूत सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन पंचायत समिती अकोलेचे गटशिक्षण अधिकारी दीपक धुमाळ यांना देण्यात आले. यावेळी ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, माधवराव तिटमे आणि सचिव राम रुद्रे उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, अकोले हा अतिदुर्गम आदिवासी तालुका असून पावसाळ्यात अनेक शाळांच्या इमारतींच्या छतांमधून पाणी गळते. काही शाळांमध्ये विद्यार्थी संख्या पुरेशी असतानाही शिक्षकांची कमतरता आहे. त्यामुळे अशा शाळांमध्ये तातडीने शिक्षक उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

तालुक्यातील अनेक शाळांमध्ये पिण्याचे पाणी, वीज, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, सोलर लाईट, सीसीटीव्ही कॅमेरे, वाचनालय, क्रीडांगण व क्रीडा साहित्य, संरक्षण भिंत आदी पायाभूत सुविधांचा प्रश्न गंभीर आहे. काही ठिकाणी शासनाच्या शाळा इमारतीऐवजी खासगी इमारतींमध्ये, तर काही ठिकाणी उघड्यावर वर्ग भरवले जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच अनेक मुला-मुलींना अद्याप पाठ्यपुस्तके उपलब्ध झालेली नाहीत. त्यामुळे गरीब, सर्वसामान्य, वंचित आणि दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांच्यामध्ये निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे. परिणामी तालुक्यातील शाळांमधील विद्यार्थीसंख्याही कमी होत चालली असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांना तातडीने आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांच्या शैक्षणिक अडचणी दूर कराव्यात, अशी मागणी ग्राहक पंचायतीने केली आहे.

निवेदनावर ग्राहक पंचायत जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, ग्राहक पंचायतीचे मार्गदर्शक महेश नवले, माधवराव तिटमे, सचिव राम रुद्रे, ज्ञानेश्वर पुंडे, अध्यक्ष दत्ता शेनकर, रामदास पांडे, राजाराम वाकचौरे, संतोष गिते, अनंत घाणे, गंगाराम धिंदळे, गणपत थिगळे, रामदास पवार, अशोक उघडे, राजेंद्र लहामगे, कैलास येलमामे, पांडुरंग पथवे, भाऊसाहेब वाकचौरे, रामहरी तिकांडे, भाऊसाहेब गोर्डे, प्रकाश कोरडे, प्रमोद मंडलिक, नवनाथ आवारी, दत्ता ताजणे, सुदाम मंडलिक आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयात रोजगार महाकुंभ

## ११ आस्थापनांतील १६९ जागांसाठी ७१५ नोकरी इच्छुकांची नोंदणी

**● पाथर्डी । वीरभूमी–**



येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात लोकनेते गोपीनाथ मुंडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

या रोजगार मेळाव्यात विविध ११ आस्थापनांमधील १६९ जागांसाठी तब्बल ७१५ नोकरी इच्छुक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. मेळाव्याचे उद्घाटन पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या हस्ते झाले.

यावेळी उपनगराध्यक्षा मंगलताई कोकाटे, मेघाताई चिंतामणी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य प्रा. उत्तम लोखंडचूर, रोजगार मेळावा समन्वय समितीचे सदस्य अक्षय टेकाळे, कौशल्य रोजगारचे जिल्हा समन्वयक गोपीचंद गव्हाणे, महाविद्यालय समन्वयक डॉ. किरण गुलदगड, राज्य परिवहन महामंडळाचे अमित बनसोडे, योगेश मिसाळ आदी उपस्थित होते.

यावेळी नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी रोजगार मेळाव्याचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले, पूर्वी नोकरीच्या संधींसाठी विद्यार्थ्यांना विविध शहरांमध्ये जाऊन मुलाखती द्याव्या लागत होत्या. आता तालुकास्तरावरच रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र शासनाचे कौशल्य, रोजगार व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील ४०० हून अधिक तालुकास्तरीय ठिकाणी हा उपक्रम एकाच वेळी राबविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हा रोजगाराभिमुख उपक्रम असून, विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आव्हाड यांनी केले. २१व्या शतकातील बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येकाने कौशल्याधारित शिक्षण घेऊन नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. भारतात मोठ्या प्रमाणात तरुण लोकसंख्या असून, या तरुणांना कौशल्याधारित शिक्षणाची जोड मिळाल्यास देशाच्या विकासाला मोठी चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अशोक कानडे यांनी केले, तर आभार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य प्रा. उत्तम लोखंडचूर यांनी मानले.

---

# पारनेर पोलीस स्टेशन झाले चकाचक



**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशनच्या कार्यालयीन इमारतीला नवे रूप देण्यात आले आहे. स्वच्छता, रंगरंगोटी, सुशोभीकरण तसेच आवश्यक दुरुस्तीची कामे करण्यात आल्याने पोलीस स्टेशनचा परिसर चकाचक झाला आहे. या बदलामुळे पोलीस कर्मचारी तसेच विविध कामांसाठी पोलीस स्टेशनमध्ये येणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

पोलीस स्टेशनच्या इमारतीतील विविध भागांची स्वच्छता करून परिसर अधिक नीटनेटका करण्यात आला आहे. कार्यालयीन खोल्या, आवार, प्रवेशद्वार तसेच नागरिकांच्या संपर्कातील भागांमध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत. परिसरातील अनावश्यक वस्तू हटवून स्वच्छ आणि प्रशस्त वातावरण निर्माण करण्यात आले आहे.

पोलीसस्टेशनमध्येदररोजविविध तक्रारी, अर्ज तसेच कायदेशीर कामांसाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. त्यामुळे पोलीस स्टेशनचा परिसर स्वच्छ, शिस्तबद्ध आणि नागरिकांसाठी सुलभ असणे महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या सुशोभीकरणामुळे पोलीस स्टेशनच्या वातावरणात सकारात्मक बदल झाल्याचे दिसून येत आहे.

पारनेर पोलीस स्टेशनला मिळालेल्या या नव्या रूपामुळे पोलीस प्रशासनाच्या कामकाजासाठी प्रसन्न वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांसाठीही पोलीस स्टेशन अधिक स्वागतार्ह बनले आहे.